# नवी मुंबई महानगरपालिका
# एकात्मिक आरोग्य कुटूंब कल्याण सोसायटी
# राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान

---

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत रिक्त असलेल्या पदांची भरती प्रक्रिया खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात प्रतिमहा ठोक मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने करावयाची आहे. वैद्यकीय अधिकारी पूर्णवेळ व वैद्यकीय अधिकारी अर्धवेळ या पदाकरीता थेट मुलाखत (Walk in interview) दि.10/09/2025 रोजी घेण्यात येईल व स्टाफ नर्स, ए.एन.एम. व औषधनिर्माता पदाकरीता इच्छुक व पात्र उमदेवारांनी विहित नमुन्यात अर्ज आरोग्य विभाग, 3 रा मजला, नमुंमपा मुख्यालय, प्लॉट नं.1, से.15 अे, किल्लेगावठाण जवळ, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई 400614 येथे दि. 26/08/2025 ते 11/09/2025 पर्यंत सादर करावे.

| पदनाम | अर्हता | प्रवर्ग | वय मर्यादा | मासिक ठोक मानधन |
|---|---|---|---|---|
| वैदयकीय अधिकारी (पूर्णवेळ) | • मान्यता प्राप्त विदयापीठाची एम.बी.बी.एस. पदवी.<br>• महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी बंधनकारक<br>• शासकीय/स्थानिक संस्था/ट्रस्ट/खाजगी यांचा संबंधित क्षेत्रातील अनुभव आवश्यक | अज-1, वि.जा.अ. - 1, भ.ज.(ब) - 1, इमाव-2, सा.शै.मा.प्र.-1, आ.दु.घ. - 1, खुला - 3<br>**एकूण -10** | 70 वर्षा पर्यंत | 60,000/- |
| वैदयकीय अधिकारी (अर्धवेळ) | • मान्यता प्राप्त विदयापीठाची एम.बी.बी.एस. पदवी.<br>• महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी बंधनकारक<br>• शासकीय/स्थानिक संस्था/ट्रस्ट/खाजगी यांचा संबंधित क्षेत्रातील अनुभव आवश्यक | बिंदू नामावली लागू नाही | | 30,000/- |
| स्टाफ नर्स (स्त्री) | • 12 वी उत्तीर्ण आणि जनरल नर्सिंग आणि मिड वाईफ डिप्लोमा किंवा B.sc नर्सिंग कोर्स उत्तीर्ण<br>• महाराष्ट्र कौन्सिलची नोंदणी बंधनकारक | इमाव - 2, सा.शै.मा.प्र.-3, आ.दु.घ - 1<br>**एकूण - 6** | खुला 38 राखीव 43 | 20,000/- |
| स्टाफ नर्स (पुरुष) | | वि.जा. (अ) - 1<br>**एकूण - 1** | | |
| ए.एन.एम. | • 10 वी पास आणि ए.एन.एम.कोर्स उत्तीर्ण<br>• महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी बंधनकारक | भ.ज.(क) - 2, सा.शै. मा.प्र.-6, आ.दु.घ. -2<br>**एकूण - 10** | खुला 38 राखीव 43 | 18,000/- |
| औषधनिर्माता | • 12 वी + डी. फार्म किंवा बी. फार्म पदवीधर<br>• महाराष्ट्र कौन्सिलची नोंदणी बंधनकारक | सा.शै.मा.प्र -2, आ. दु. घ. - 1,<br>**एकूण - 03** | खुला 38 राखीव 43 | 17,000/- |

**राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान**
**नवी मुंबई महानगरपालिके अंतर्गत रिक्त पदभरतीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सुचना.**

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखडयानुसार मंजूर पदांपैकी रिक्त पदे भरण्याकरीता जाहिरात nmmc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून अर्ज करावयाच्या पध्दतीबाबत सर्वसाधरण सुचना/माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

सर्व सूचनांचे काळजी पूर्वक वाचन करुन अर्ज विहित केलेल्या पध्दतीनुसारच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या नमुद माहितीच्या आधारे व मुलाखती दरम्यान सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या/कागदपत्रांच्या आधारे उमेदवार पात्र व अपात्र ठरविण्यात येईल. व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

अर्ज स्वीकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवाराची निवड झाली असा होणार नाही. निवड प्रक्रिये दरम्यान कोणत्याही वेळी किंवा उमेदवाराच्या निवडी नंतर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याने किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमदेवाराची/निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

**क) अर्ज करावयाच्या अनुषंगाने सुचना -**

1) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून नियुक्ती 6 महिन्यांच्या कालावधी करीता राहील.

2) सर्व उमेदवारांनी जाहिरात मध्ये नमुद अर्जा मध्ये अर्ज विहित कालावधीत भरणे आवश्यक आहे.

3) अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्दयाची माहिती अचूक भरावी. एकदा भरलेली माहिती अंतिम समजण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

4) वैद्यकीय अधिकारी पूर्णवेळ व वैद्यकीय अधिकारी अर्धवेळ पदाकरीता थेट मुलाखती दि.10/09/2025 रोजी घेण्यात येईल. सकाळी 10.00 ते 2.00 या वेळेत नोंदणी, मुळ कागदपत्रांची छाननी व तपासणी करण्यात येईल आणि त्याच दिवशी उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.

5) स्टाफ नर्स, ए.एन.एम. व औषधनिर्माता पदाकरीता पूर्ण भरलेला अर्ज व (त्र) मधील मुद्दा क्र. 5 नुसार सर्व कागदपत्रे वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग, 3 रा मजला, नमुंमपा मुख्यालय, प्लॉट नं. 1, से.15 ए, किल्ले गावठाण जवळ, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई -400614 येथे (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) प्रत्यक्षात (By Hand) व कुरीअरने दि. 26/08/2025 ते दि. 11/09/2025 पर्यंत सादर करण्यात यावेत. दिलेल्या मुदतीनंतर सादर करण्यात येणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. (टपालाने/कुरीयरने सादर करण्यात आलेले अर्ज विहित कालावधीत या कार्यालयात पोहोचतील याची दक्षता घ्यावी. उशीरा प्राप्त अर्जाची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.)

**ख) वयोमर्यादा :-**

1) सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचे दि. 25 एप्रिल 2016 चे शासन निर्णयानुसार अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकास पदासाठी कमाल वयोमर्यादा -
   अ) अराखीव प्रवर्गासाठी 38 वर्ष
   ब) राखीव प्रवर्गासाठी 43 वर्ष राहील.

2) मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान मुंबई दि. 25 मे 2019 रोजीच्या पत्रानुसार अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवारोच एमबीबीएस, विशेषतज्ञ आणि अतिविशिष्ट विशेषतज्ञ यांची वयोमर्यादा 70 वर्ष राहील. वयाच्या 60 किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमदेवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडून प्राप्त केलेले शारीरीक दृष्टया व मानसिक दृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

**ग) अर्ज भरण्याच्या सुचना :-**

1) उमदेवाराने स्वत:चे पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्रा प्रमाणेच अचूक पणे नोंदवावे. अर्जा सोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

2) माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाण पत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीखच अर्जात नमूद करावी.

3) जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापर्यंत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष) अर्जात अचूक नमुद करावे.
4) अर्जात उमेदवाराचे लिंग या बाबतची माहिती नमूद करावी.
5) अर्ज करीत असणारी अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) अर्जा सोबत सादर करणे आवश्यक आहे.
6) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा आणि त्याने सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) सादर करणे आवश्यक राहील.
7) उमेदवाराने आपला जातीचा तपशिल अचूकपणे नमूद करावा.
8) इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिक दृष्टया दुर्बल घटक, सा.शै.सा.प्र. प्रवर्गात मोडणाऱ्या उमदेवारांनी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अशा उमदेवारांचे अर्ज नाकारण्यात येतील.
9) उमेदवाराने आपला सध्याचा पत्ता व कायम स्वरुपी पत्ता अर्जामध्ये अचूक नमूद करावा.
10) अर्जामध्ये उमदेवाराने स्वत:चा वैध ई-मेल आयडी/पर्यायी ई-मेल आयडी, चालू भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे. मुलाखती साठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखती संदर्भात देण्यात येणाऱ्या सुचना ई-मेल द्वारे देण्यात यतील. पात्र उमदेवारांची यादी उपरोक्त नमुद संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर ई-मेल आयडी पद भरती प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत चालू राहील व ई-मेल वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
11) पदभरतीबाबत पात्र/अपात्र ठरणाऱ्या उमदेवारांची यादी आणि पदभरतीबाबतच्या आवश्यक सुचना व सुधारणा वेळोवेळी nmmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.
12) आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लुएस) उमदेवारांकरीता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.राआधो-4019/प्रक्र.31/16/अ, दि. 12/02/2009 व दि. 31/05/2021 अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
13) मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज आरक्षणामधून सादर करावयाचा असल्यास अर्जासोबत जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.
14) अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा, याबाबत चे हमी पत्र देण्यात यावे.

**घ) शैक्षणिक अर्हता :-**

1) शैक्षणिक अर्हते बाबतचा सविस्तर व अचूक तपशिल नोंद करावा.
2) अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराकडे जाहिराती मध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.
3) अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रात नमूद गुण व गुणांची टक्केवारी अर्जात नमुद टक्केवारी न जुळल्यास असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.
4) उमेदवारांची अर्जामध्ये नमुद माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.
5) वैद्यकीय अधिकारी पदासाठी पात्र उमेदवारांनी मुलाखतीच्या दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या मुळ गुणपत्रिका सादर न केल्यास सदरील उमेदवाराला अपात्र ठरविले जाईल.
6) पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यता प्राप्त विद्यापिठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे.

**ड.) अनुभव :-**

1) शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा फक्त शासकीय व निमशासकीय व खाजगी अनुभव ग्राहय धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापुर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.
2) अनुभवाचा तपशिल नमुद करीत असताना ज्या शासकीय, निम शासकीय व खाजगी कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे अशाच शासकीय, निम शासकीय व खाजगी कार्यालयाचा तपशिल फॉर्ममध्ये नमुद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राहय धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.
3) अनुभव प्रमाणपत्रामध्ये तपशिल नमुद करताना रुजू दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अूचकपणे नमूद करावा. सदर कलावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.
4) ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राहय धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

**च) संगणक अर्हता :-**

MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा.

**छ) लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र :-**

1) लहान कुटूंबाची अट दि. 23/07/2020 पासून लागू करण्यात आली असून दि. 23/7/2020 पासून दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमदेवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.

**ज) उमेदवाराचा फोटो व स्वाक्षरी :-**

1) उमेदवाराने अर्जामध्ये फोटोकरीता राखीव जागेवर त्याचे अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करु नये.
2) स्वाक्षरी करीता राखीव जागेत स्वाक्षरी करावी.

**झ) निवड प्रक्रिया :-**

1) वैद्यकीय अधिकारी पूर्णवेळ व अर्धवेळ पदाची निवड थेट मुलाखतीद्वारे करण्यात येईल.
2) स्टाफ नर्स, ए.एन.एम. व औषधनिर्माता पदाकरीता गुणांकन पध्दतीनुसार उमेदवाराची निवड करण्यात येईल.

**त्र) सर्वसाधारण सुचना :-**

1) सदर पदभरती प्रक्रियेबाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती आरोग्य विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमदेवारांनी nmmc.gov.in या संकेतस्थळास भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.
2) जाहिरातीत नमुद केलेली पदे ही पूर्णत: कंत्राटी स्वरुपाची असून ती राज्य शासनाची नियमित पदे नाहीत. या पदांचा राज्य शासनाच्या पदांशी काहीही संबंध नसून उमेदवार राज्य शासनाच्या नियमित पदावर समायोजन करण्याची मागणी करु शकणार नाही.
3) जाहिरातीत नमुद केलेले पदाचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.
4) निवड झालेल्या उमेदवारांना पदे रिक्त असलेल्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी नियुक्ती देण्यात येईल, याची नोंद घ्यावी. नियुक्ती आदेश दिल्यानंतर 7 दिवसांच्या आत नियुक्तीचे ठिकाणी रुजू होणे बंधनकारक

राहील. (उमेदवाराने कोणत्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल. अन्यथा त्यांचे नियुक्ती आदेश संपुष्टात आणून प्रतिक्षाधीन यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.)

5) विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह आपला अर्ज बंद लिफाफा वर खालील प्रमाणे नमुद करुन सादर करावे.

- विषय :- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अर्ज सादर करणेबाबत.
- पदाचे नाव :-

6) अर्ज सादर करावयाचा पत्ता :- वैद्यकीय आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग,
3 रा मजला, नमुंमपा मुख्यालय, प्लॉट नं. 1,
से.15 ए, किल्ले गावठाण जवळ, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई -400614

7) अर्ज दि. दि.26/08/2025 ते दि. 11/09/2025 पर्यंत कार्यालयीलन कामकाजाच्या दिवशी (शनिवार, रविवार व शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत सकाळी 9.45 ते सायंकाळी 6.15 या वेळेत सादर करावे. दि.11/09/2025 नंतर प्राप्त अर्ज ग्राहय धरले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

8) भरती प्रक्रिया स्थगित करणे, रद्द करणे, पदभरती प्रक्रियेत बदल करणे, पदांच्या संख्येत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त, नमुंमपा यांच्या स्तरावर राखून ठेवण्यात आले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

9) वैद्यकीय अधिकारी पदासाठी पात्र उमेदवारांकडे मुलाखतीच्या दरम्यान खालील नमुद सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रति असणे आवश्यक आहे. सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रति सादर न केल्यास सदरील उमेदवाराला अपात्र ठरविले जाईल.

- आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित केलेल्या प्रति अर्जाच्या नमुन्यात जोडाव्यात.

1. वयाचा पुरावा (10 वी गुणपत्रक)
2. शैक्षणिक अर्हतेबाबतची गुणपत्रिका व प्रमाणपत्र
3. कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (As Applicable)
4. शासकीय, निमशासकीय व खाजगी संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे
5. राखीव संवर्गातील उमेदवारांनी जात प्रमाणपत्र
6. अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
7. नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र
8. आधारकार्ड
9. पॅनकार्ड
10. सध्याचा फोटो
11. अर्जदार विवाहीत असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette)
12. लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)
13. फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमी पत्र

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव**
**एकात्मिक आरोग्य कुटूंब कल्याण सोसायटी**
**नवी मुंबई महानगरपालिका**

## अर्जाचा नमूना

(---------------------------या पदासाठी अर्ज)

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून साक्षांकित करावा

प्रति,
वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव,
एकात्मिक आरोग्य कुटुंब कल्याण सोसायटी,
नवी मुंबई महानगरपालिका.

1. संपुर्ण नाव (प्रथम आडनाव) :---------------------------------------------------------------------------

2. पत्रव्यहाराचा संपूर्ण पत्ता पिनकोडसहित :---------------------------------------------------------------------------

- ---------------------------------------------------------------------------

3. मोबाईल क्र. :1. ------------------------------------2. -------------------------------------

4. जन्मतारीख :- -----------------दि.26/08/2025 रोजीचे वय ------ वर्ष ----- महिने ----दिवस

5. राष्ट्रीयत्व :- ---------------------------------------------------------------------------

6. उमेदवार विवाहीत /अविवाहित:---------------------------------------------------------------------------

7. अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ? होय/नाही

8. अर्जादाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे काय ? होय/नाही जातीचा प्रवर्ग :-

9. ई-मेल आयडी :- ---------------------------------------------------------------------------

10. खाली नमूद केलेल्या कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केलेला आहे त्याप्रमाणे चौकोनात √ अशी खुण करावी.

| अ. जा | अ. ज | वि.जा (अ) | भ.ज (ब) | भ.ज (क) | भ.ज (ड) | विमाप्र | इमाव | सा.शै.मा.प्र. | आ.दु.घ. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

11. शैक्षणिक अर्हता :-

| उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ /मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षाचे एकूण गुण | अंतिम वर्षाचे मिळालेले एकूण गुण | अंतिम वर्षाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

12. अनुभव :-

| संस्थेचे नाव | संस्थेचा प्रकार (शासकीय/निमशासकीय/खाजगी) | कालावधी | | एकुण वर्षे |
|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | |
| | | | | |
| | | | | |

13. अवगत असणाऱ्या भाषा :

| | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| बोलणे | | | |
| लेखन | | | |

14. आपणा विरुध्द न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इ. कारवाई चालू आहे काय? होय/नाही (असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा)

15. अर्जासोबत खालील छायांकित सत्य प्रती जोडलेल्या आहेत.

1) 5)
2) 6)
3) 7)
4) 8)

वर नमुद केलेली सर्व माहिती खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशिर कारवाई होईल याची मला जाणिव आहे.

ठिकाण:-

दिनांक:-

(अर्जदाराची स्वाक्षरी व नाव)

# प्रतिज्ञापत्र
## (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र)
## नमुना-अ

मी श्री/श्रीम. ----------------------------------------------------श्री. ---------------------------------------- यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय--------वर्षे राहणार---------------------------------------------------- याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

1) मी---------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

2) आज रोजी मला -------------------(संख्या) इतकी मुले हयात आहेत. यापैकी दि.23 जुलै, 2020 नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या --------आहे. (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा)

3) दि. 23 जुलै, 2020 रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दि. 23 जुलै 2020 व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदांसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

दिनांक:-

सही-----------------------------------

( )

# फौजदारी गुन्हा दाखल नसलेबाबतचे
# हमीपत्र

मी. श्री./श्रीमती/कुमारी ---------------------------------------------------------------------वय----------------

वर्ष ------- सध्या राहणार ---------------------------------------------------------------------------------

असे लिहून देते/देतो की, या पत्यावर --------------- वर्षापासून आजपर्यंत राहत आहे.

तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमूद कालावधीत माझेविरुध्द मी राहत असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या आभिलेखावर काही एक दखलपात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

सही/-